Vol 5 Issue 5 Nov 2015

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

**Golden Research Thoughts**
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 5 | Nov - 2015

# संशोधन समस्येची निवड हीच खरी समस्या

प्रा. डॉ. आदिनाथ मोरे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख , कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
लासलगाव.

### 1. प्रस्तावना:

वर्तमान जागतिक मानवी सभ्यतेच्या प्रगतीचा इतिहास हा त्या त्या काळातील मानवी जिज्ञासा आणि त्यातून झालेल्या संशोधनात्मक अविष्कारांवर आधारलेला आहे. पाषाण युगापासून ते आज पर्यंत मानवाने आवतीभोवती घडणाऱ्या विविध नैसर्गीक आणि मानवी घटनांमधील कार्यकारण संबंध समजून घेण्याच्या कुतुहलातून आणि त्यातून झालेल्या संशोधाच्या बळावरच प्रगतीचे अनेक टप्पे पार केले आहेत. भौतिक शास्त्रातील अग्नीचा शोध, राज्यशास्त्रातील मताचा शोध आणि अर्थशास्त्रातील पैशाचा शोध या सारख्या असंख्य शोधांमुळे मानवी जीवन अधिक गतिमान आणि वैभवसंपन्न झाल्याचे आपण पाहतो. मानवाने प्रगतीचे कितीही टप्पे पार केले असले तरी आजही त्याचे संशोधन चालूच आहे. कारण मानवामधील विविध गोष्टी जाणून घेण्याची जिज्ञासा जो पर्यंत टिकून राहिल तो पर्यंत विविध क्षेत्रातील संशोधन चालूच राहणार आहे.

आपल्या आवती भोवती घडणाऱ्या घटना या निसर्ग निर्मीत आणि मानव निर्मीत अशा दोन प्रकारच्या असतात. मानवनिर्मीत घटनांशी संबंधीत अभ्यासास सामाजिक संशोधन असे म्हणतात. या संशोधनातून विविध सामाजिक शास्त्रे अस्तित्वात आली असल्याचे दिसून येते. अलिकडील काळात संपूर्ण जगभर सामाजिक शास्त्रांच्या असंख्य उपविषयांमध्ये मोठया वेगाने संशोधन होत आहे. जलद संपर्क माध्यमांमुळे जगातील कानाकोपऱ्यातील संशोधन संदर्भासाठी लगेच उपलब्ध होत आहे. संशोधनाचे अनेक प्रकार असले तरी संशोधन समस्येची निवड प्रत्येक संशोधनात भेडसावणारी एक सामाईक अशी समस्या दिसून येते. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत विषय निबंधासाठी निवडला आहे.



### 2. उद्दिष्टये:

• सामाजिक शास्त्रातील संशोधनाचा अर्थ समजून घेणे.
• संशोधन प्रकारांचा आढावा करणे.
• संशोधकांना संशोधन समस्या निवडताना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
• संशोधन समस्येची निवड सुलभ व्हावी यासाठी उपाय सुचविणे.

### 3. अभ्यास पद्धती:

प्रस्तूत निबंधसाठी दुय्यम माहितीचा वापर केला असून पी.एच.डी. पद्वीसाठी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी समस्येची निवड करताना येणाऱ्या अडचणींचे करण्यात आलेल्या निरंतर निरिक्षणातून हाती आलेल्या माहितीचा वापर प्रस्तूत निबंध लिहिण्यासाठी केला आहे.

### 4. संशोधन अर्थ:

संशोधन म्हणजे सत्याचा शोध घेण्यासाठी राबविण्यात आलेली अन्वेषणाची शास्त्रीय पद्धती होय. संशोधन ही मानवी जिज्ञासा शमविण्यासाठी हाती घेतलेली एक शास्त्रीय प्रक्रिया असते. सध्याच्या मानवी सभ्यतेत संशोधन हा एक महत्त्वाचा व्यवहार बनलेला आहे. संशोधन हा नवीन ज्ञान मिळविण्याचा सूव्यवस्थित प्रयत्न असतो (रेडमन व मोरी), संशोधन हा ज्ञानाच्या संबंधीत भागाचा शोध व विकास या दिशेने असलेला पद्धतशीर कार्यक्रम होय (जॉन बेस्ट), एकत्र राहणाऱ्या आणि एकमेकांशी संबंधीत असणाऱ्या लोकांच्या आंतरक्रियां बाबतचे तर्कशुद्ध संशोधन म्हणजे सामाजिक संशोधन होय (बोगाड्र्स)

थोडक्यात संशोधन हे कोणत्यातरी समस्येचे उत्तर देण्यासाठी केले जाते. संशोधनासाठी विचारपूर्वक अशी योजना आखली जाते. संशोधनासाठी पुरावे गोळा केले जातात. ज्ञात नसलेल्या गोष्टी शोधण्याचा भक्कम निर्धार संशोधक करीत असतो. संशोधन हे वस्तूस्थिती मांडण्याचा प्रयत्न करते. संशोधन हे अचूक निरिक्षण व

माहितीवर आधारलेले असते. संशोधनासाठी विशिष्ट अशा संशोधन पद्धतीची निवड केली जाते.

### *5. संशोधनाचे प्रकारः*

दोन चलांमधील कार्यकारण संबंध शोधण्यासाठी आणि निरीक्षण व सर्वेक्षण पद्धतीचा जेथे वापर केला जातो असे वर्णनात्मक संशोधन, संशोधकास संशोधन समस्येविषयी काहीच ज्ञान नाही किंवा थोडेसेच ज्ञान आहे असे गृहित धरून परिकल्पनेची किंवा सिद्धांताची चाचणी घेण्यासाठी उपयुक्त ठरणारे समन्वेषणात्मक संशोधन, दोन चलांमधील कार्यकारण संबंध प्रयोगाच्या आधारे तपासून केले जाणारे प्रायोगिक संशोधन, अनेक व्यावहारीक संशोधनांचा पाया असलेले आणि विशुद्ध ज्ञान लालसेने केले जाणारे मुलभूत संशोधन, व्यवहारातील अनेक समस्यांना उत्तरे शोधून काढण्यासाठी केले जाणारे आणि समस्या हाच आधार असणारे उपयोजित संशोधन, विकासाशी संबंधीत राबविल्या जाणाऱ्या विविध प्रकल्पांचे मूल्यमापन करण्यासाठी केले जाणारे मूल्यमापन संशोधन, विविध बाबींसंबंधी वस्तूस्थिती शोधून काढण्यासाठी आणि सर्वेक्षणाच्या आधारे केले जाणारे सर्वेक्षण संशोधन, संख्यात्मक माहितीचा वापर करून केले जाणारे संख्यात्मक संशोधन, व्यक्ति व समाजाच्या वर्तनावर आधारलेले गुणात्मक संशोधन, ऐतिहासीक घटनांचा अभ्यास करणारे ऐतिहासिक संशोधन असे अनेक संशोधन प्रकार सामाजिक शास्त्रातील संशोधनासाठी वापरले जातात.

### *6. समस्या निवडतील समस्याः*

सर्वसाधारणपणे पीएच्. डी. पद्वीसाठी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनाचा पूर्वानुभव फारसा नसतो. संशोधन करण्यासाठी तरूण विद्यार्थ्यांनी अधिक रूची दाखवावी अशी एक अपेक्षा असते. परंतु असे तरूण संशोधक जेव्हा एखाद्या विषयावर संशोधन करू इच्छितात तेव्हा त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यातील एक म्हणजे संशोधन समस्येची निवड करणे ही होय. प्रामुख्याने समस्येची निवड करताना संशोधकांना पुढील समस्यांचा सामना करावा लागातो.

#### *अल्पानुभवः*

जेव्हा तरूण विद्यार्थी संशोधनामध्ये रूची दाखवतात तेंव्हा संशोधनासाठी लागणारा उत्साह व सकारात्मक दृष्टीकोन तरूणांमध्ये दिसून येतो. परंतु संशोधनासाठी लागणारा अनुभूव त्यांच्याकडे नसतो. संशोधनासाठी लागणारा दृष्टीकोन त्यांच्यामध्ये नसतो. बऱ्याचदा पीएच्. डी. पद्वी मिळविणे या हेतूने संशोधन करणारे अनेक विद्यार्थी समस्या निवडीबाबत गोंधळलेले असतात.

#### *वाचन, चिंतन व मननः*

ही संशोधनासाठी लागणारी त्रिसूत्री असते. मात्र तरूण संशोधकांमध्ये या बाबींचा अभाव जाणवतो. वास्तविक संशोधन समस्येचा जन्म हा संशोधकांच्या मनातून होत असतो आणि अशा अंर्तःमनातून आलेल्या समस्येलाच संशोधक न्याय देऊ शकतो. परंतु पुरेसे वाचन, चिंतन व मनन या अभावी समस्या कशी निवडावी हा यक्ष प्रश्न संशोधकांसमोर निर्माण होतो.

#### *प्रतिक्षाः*

हल्लीच्या स्पर्धेच्या युगात शिक्षण पूर्ण करून नोकरी मिळवणे हा सर्वांसाठीच कळीचा मुद्दा आहे. बहुतेक संशोधक याच हेतुने संशोधन करतात त्यामुळे संशोधनासाठी काही काळ प्रतिक्षा करावी लागते. संशोध ही निरंतर चालणारी प्रक्रिया असते. या बाबी त्याच्या पचनी पडत नाहीत त्यामुळे संशोधनाचा मूळ हेतू मागे पडतो. नोकरीच्या प्रतिक्षेत असणाऱ्या संशोधकांकडे प्रतिक्षा क्षमता नसल्यास समस्या निवडीवर त्याचा विपरीत परिणाम होत असतो.

#### **SWOT Analysis:**

संशोधनाशी संबंधीत समस्येची निवड करताना अनेक संशोधक स्वताःचे SWOT Analysis करीत नाहीत. त्यामुळे बऱ्याचदा संशोधनासाठी लागणारी पात्रता, संशोधनातील अभिरूची, आवश्यक साधन सामग्री उदा. वेळ व पैसा या बाबींचा अंदाज न घेता समस्येची निवड केली जाते.

#### *समस्येचे सामाजिक महत्त्वः*

प्रत्येक समस्येला काही सामाजिक मूल्य असते परंतु परंतु माहितीच्या अभावामुळे अनेक नवोदित संशोधकांना समस्येचे सामाजिक महत्त्व विषद करता येत नाही. संशोधन प्रस्तावात यासंबधी त्रूटी दिसून येतात. केवळ समस्येचे सामाजिक महत्त्व संशोधन प्रस्तावात लिहिने एवढेच त्याचे महत्त्व नसते तर संशोधनातुन आलेले निष्कर्श सामाजाच्या हिताचे कसे असतील हे ठरविणे महत्त्वाचे असते. परंतु समस्येची निवड करताना बऱ्याचदा याबाबीचा विचार होत नाही.

#### *संशोधन योग्यताः*

प्रामुख्याने मुल्यमापन संशोधन प्रकारात विशिष्ट योजनेचे, प्रकल्पाचे मूल्यमापन करण्यासाठी संशोधन केले जाते. परंतु अशा एखाद्या योजनेचे किंवा प्रकल्पाचे मुल्यमापन करण्यासाठी काही कालावधी जाऊ द्यावा लागतो तेव्हाच संबंधीत बाबीचे मुल्यमापनात्मक संशोधन करता येते थोडक्यात अशी समस्या संशोधनासाठी निवडताना कालावधीच्या दृष्टीकोनातून ती संशोधन योग्य आहे का हे ठरविताना संशोधकांना अडचणी येतात.

*मार्गदर्शनाचा अभावः*

संशोधन करणारे विद्यार्थी संशोधन समस्येची निवड करताना मिळेल तेथून माहिती जमविण्याचा प्रयत्न करतात. यासाठी ते विविध तज्ज्ञांच्या संपर्कात येतात तेव्हा त्यांचा वैचारीक गोंधळ होताना दिसतो. मार्गदर्शकांच्या वैचारिक दृष्टीकोनाचा प्रभाव समस्येची निवड करताना पडल्यास वैचारिक अंर्तविरोध निर्माण होण्याची शक्यता असते.

*7. समस्या निवडीचे स्त्रोतः*

संशोधन समस्येची निवड करताना संशोधकाना पडणारे दोन महत्त्वाचे प्रश्न म्हणजे समस्याच न सुचणे आणि सुचलेली समस्या योग्य शिर्षकाच्या रूपात न मांडता येणे होय. प्रामुख्याने ही योग्यता संशोधकाचे वाचन, निरीक्षण आणि अनुभव या बाबींवर अवलंबून असते नवागत संशोधकांसाठी समस्येची निवड करणे हीच खरी समस्या असते अशा परिस्थित संशोधकास संशोधन समस्या निवडताना पुढील स्त्रोतांचा उपयोग होऊ शकतो.

*अनुभवः*

वर्गातील व्याख्याने, तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन चर्चासत्रांमधून होणाऱ्या विषयावरील विविधांगी चर्चा तसेच दैनंदिन जीवनातील अनुभव इ. द्वारे संशोधकास संशोधनासाठी समस्या उपलब्ध होऊ शकते म्हणून सामाजिक शास्त्रात संशोधन कररणाऱ्या संशोधकांनी आपले अनुभव विश्व समृद्ध केले पाहिजे.

*वाचनः*

जेव्हा आपल्या आवडीच्या विषयाची पुस्तके, मासीके, संशोधनपर लेख आपण वाचतो तेंव्हा संशोधकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होत असतात त्यातून जिज्ञासू संशोधकांना संशोधनासाठी आवश्यक असलेली समस्या सूचण्यास मदत होत असते.

*संशोधीत साहित्यः*

अनेक लोक विशिष्ट विषयावर अनेक अंगानी संशोधन करीत असतात. अशा संशोधनाचे निष्कर्श पूढील संशोधनासाठी समस्या पुरवित असतात सहाजिकच शोधनिंबंध तसेच संशोधन प्रबंधांचे वाचन हा देखील संशोधन समस्या मिळण्याचा एक रास्त मार्ग आहे.

*मार्गदर्शनः*

संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रसंगी संशोधक, प्रशासक, विविध क्षेत्रातील जाणकार व तज्ज्ञ मंडळींशी केलेल्या सल्ला मसलतीतुन, घेतलेल्या मार्गदर्शनातुन संशोधनासाठी योग्य अशी समस्या मिळू शकते. कारण दिर्घकाळ केलेल्या संशोधनातून संबधीतांमध्ये संबंधीत विषयाकडे बघण्याचा एक समाजहितैशी दृष्टीकोन तयार झालेला असतो

*तंत्रज्ञानातील बदलः*

अलिकडील काळात विविध क्षेत्रात वापरले जाणारे तंत्रज्ञान झपाटयाने बदलत आहेत. त्यामुळे विविध क्षेत्रात नवनवीन समस्या निर्माण होत आहे, समस्यांचे स्वरूपही बहुआयामी होत आहे. सहाजिकच तंत्रज्ञानातील बदल अवगत असणाऱ्या संशोधकांना नवनवीन समस्या उपलब्ध होऊ शकतात.

*स्थलदर्शनः*

सशोधक जेव्हा विविध स्थळांना भेटी देत असतो तेंव्हा तो विविध गोष्टींचे निरीक्षण करीत असतो अशा निरीक्षणातून व संकलीत केलेल्या माहितीतून त्यास संशोधनासाठी विषय मिळत असतो.

*8. समस्या निवडीचे निकषः*

संशोधन करणाऱ्या संशोधकांना संशोधनासाठी उचीत अशी समस्या कशी निवडावी हीच खरी समस्या असते. त्यातून मार्ग काढण्यासाठी पुढील निकष विचारात घेतल्यास संशोधनयोग्य समस्येची निवड करताना अडचणी येत नाहीत.

*संशोधकाची आवडः*

संशोधन समस्येची निवड करताना संशोकास कोणत्या विषयाची आवड आहे संशोधन करण्यासाठी कोणत्या विषयात रूची आहे याचा विचार संशोधकाने केला पाहिजे. आपल्या आवडीचा (Area of Interest) विषय निवडल्यास संशोधन अधिक अर्थपूर्ण होऊ शकते.

*संशोधन पात्रताः*

संशोधकाने संशोधनासाठी केवळ आपल्या आवडीच्या विषयाची निवड करणे पुरेसे नसते तर संबंधीत विषयामध्ये संशोधन करण्यासाठी ज्या गुण व कौशल्यांची आवश्यकता असते ते गुण, कौशल्य व ज्ञान त्याच्याकडे असले पाहिजे. कारण विशिष्ट अशा संशोधन समस्येवर संशोधन करण्यासाठी काही एक पात्रता असावी लागते अशी पात्रता संशोधकामध्ये नसेल तर संशोधनासाठी

निवडलेल्या विषयास योग्य न्याय मिळणार नाही. म्हणून संशोधकाने संशोधन विषयाशी संबंधीत पात्रतेसंबंधी स्वतःचे SWOT Analysis करून घेणे गरजेचे असते.

### *उपलब्ध साधने:*

कोणत्याही विषयावरील संशोधनासाठी वेळ, पैसा आणि संयम या बाबी महत्त्वाच्या असतात. बऱ्याचदा पदवीसाठी संशोधन करणाऱ्या संशोधकांकडे या गोष्टी अभावानेच आढळतात. थोडक्यात संशोध ही एक वेळखाऊ आणि खर्चिक प्रक्रिया असते बऱ्याचदा योग्य पद्धतीचा वापर न केल्याने माहिती संकलीत करताना संशोधकांचा धीर सुटतो त्यामुळे या साऱ्या बाबींचा विचार करूनच संशोधन समस्येची निवड केली पाहिजे.

### *समस्येची संशोधन योग्यता :*

बऱ्याचदा संशोधन समस्येची निवड करताना ती समस्या संशोधन योग्य आहे का? याचा विचार केला जात नाही. त्यामुळे संशोधनास सुरूवात केल्यानंतर माहिती संकलन व तीचे शास्त्रीय विश्लेषण करताना अडचणी येऊ लागतात म्हणून समस्येची निवड करताना ती संशोधनास योग्य आहे का? संबधीत विषयात संशोधन मूल्य आहे का? याचा विचार संशोधकांने अगोदरच केला पाहिजे.

### *समस्येची उपयुक्तता:*

समस्येची निवड करताना तो विषय व्यावहारीक दृष्टया कितपत महत्त्वाचा आहे याचाही विचार संशोधकाने केला पाहिजे. संशोधन योग्य समस्या मोठया प्रमाणात उपलब्ध असतात त्यातून एका समस्येची निवड करताना म्हणूनच तीचे तौलनीक महत्त्व किती याचा देखील विचार संशोधकाने केला पाहिजे.

### *पायाभूत सुविधा:*

कोणत्याही विषयावरील संशोधनासाठी काही विशिष्ट पायाभूत सुविधांची नितांत आवश्यकता असते. उदा. संशोधन साहित्य उपलब्ध असलेले ग्रंथालय, संकलीत माहितीवर सांख्यिकी प्रक्रिया करण्याची सुविधा, इंटरनेट, भाषांतर तज्ज्ञ व इतर तत्सम बाबी वेळेत उपलब्ध होणे दर्जेदार संशोधनासाठी गरजेचे असते. संशोधकाने या बाबींचा विचार संशोधन समस्येची निवड करताना आवश्य केला पाहिजे.

### *सर्मपकपणा:* (Relvence)

संशोधनासाठी निवडलेला विषय सामाजिकदृष्टया सर्मपक असणे आवश्यक असते कारण संशोधन समस्येची निवड करून संशोधक कोणत्या तरी एका विषयाच्या संदर्भातील खरी तथ्ये प्रकाशात आणत असतो. म्हणूनच त्या तथ्यांची सामाजिक उपयुक्तता किती आहे हे पाहणे महत्त्वाचे असते त्याशिवाय संशोधन अर्थपूर्ण होत नाही. मुलभूत व प्रायोजित अशा संशोधनात या बाबी पाहणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

### *9. सारांश:*

नैसर्गीक शास्त्रातील संशोधन जसे महत्त्वाचे असते तितकेच महत्त्व समाजशास्त्रीय संशोधनाला असते. नव्हे ही दोन्ही प्रकारची संशोधने ही समाजहिताची व परस्परपुरक अशा स्वरूपाची असतात. मात्र संशोधन समस्येची निवड करणे हीच खरी समस्या संशोधकांपुढे असते. कदाचित आजच्या गतिमान युगातील स्पर्धेचा तो परिणाम असेल.

मुलभूत प्रकारच्या संशोधनात ही समस्या फारसी जाणवत नाही. कारण विशुद्ध ज्ञान प्राप्तीच्या हेतूनेच असे संशोधन होत असते त्यामुळेच असे संशोधन करणाऱ्या संशोधकांमध्ये प्रंचड संयम असतो.

परंतु पद्वी मिळविण्याच्या हेतूने केल्या जाणाऱ्या संशोधनात ज्ञान प्राप्ती हा हेतू दय्यम असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत संशोधनाचा ज्ञानप्राप्तीच्या दृष्ट्रीकोनातून विचार केल्यास व संशोधन प्रक्रिया गांभीर्याने घेतल्यास समस्येची निवड ही समस्या राहणार नाही.

### *संदर्भ:*

१. कायंदे, गं. वि. (२००६): संशोधन पद्धती, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.
२. बोरूडे, रा. रं. (२००७):संशोधन पद्धतीशास्त्र, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.
३. रसाळ, रा. अ. (२०१०): संख्यात्मक तंत्रे आणि प्रकल्प कार्य, सक्सेस पब्लिकेशन्स, पुणे.
४. रानडे, पुष्पा. (२०१०): अर्थशास्त्रीय गणिती तंत्रे व संशोधन पद्धती, डायमण्ड पब्लिकेशन्स, पुणे.
५. Kulbir, Singh Sidhu. (1984): Methodology of Research in Education, Steerling Publishers (P) Ltd. New Delhi.
६. Thanulingom, N. (2000): Research Methodology, Himalaya Publishing House, New Delhi.
७. John, W. Best and James, V. Kahn. (2003): Research in Education, Prentice-Hall of India Pvt. Ltd., New Delhi.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org